आर.सी.सी.क्र. ३१३/२०१६

शासन वि. प्रभाकर

निशाणी क्र. ६९

| | | |
|---|---|---|
| साक्षीदार क्र. | : | ०५ |
| नांव | : | श्री. परमेश्वर चंद्रकांत शेनमारे |
| वय | : | २४ वर्षे |
| व्यवसाय | : | शेती |
| पत्ता | : | रा. पिंपळा बुद्रुक, ता. तुळजापूर, जि. धाराशिव |

सरतपास स.स.अ. श्री. एस. एस. धुमाळ सरकार पक्षातर्फे

१. घटना हि दि. १३.०८.२०१६ रोजी सकाळी ७.३० वाजता आरोपी क्र. १ व २ च्या शेतबांधावर घडली होती. सदरच्या वेळी मी व माझे वडील शेतामध्ये धारे काढण्यासाठी चाललो होतो. तेंव्हा आरोपी क्र. १ ते ३ यांनी काटडया आडव्या टाकलेल्या होत्या. तेंव्हा आम्ही काटडया काढुन शेताकडे जात असताना आरोपी क्र. १ ते ३ यांनी आम्हाला शिविगाळ केली. तेंव्हा माझ्या वडीलांनी त्यांना "शिविगाळ करु नका" असे म्हटले असता आरोपी क्र. २ ने माझ्या वडीलांना काठीने मारायला सुरवात केली. तेंव्हा त्यांनी माझ्या वडीलांच्या डोक्यात काठी घातली. तेंव्हा माझे वडील बेशुध्द झाले.

२. त्यानंतर मी आरडाओरडा केल्यानंतर आमच्या शेतातील गडी धनाजी शिरसठ तेथे आला. तेंव्हा आरोपींनी त्यांनापण मारहाण करण्यास सुरवात केली. तसेच, आरोपी क्र. १ ते ३ व आरोपी क्र. २ च्या पत्नीने मला मारहाण करण्यास सुरतवात केली. तेंव्हा आरोपी क्र. २ च्या पत्नीने माझ्या वडीलांच्या

छातीवर बसुन तोंडावर बुक्या घातल्या. तेंव्हा मी आरडाओरडा करायला लागल्यावर आरोपी क्र. १ व २ यांनी मला मारहाण केली. त्यानंतर मला जिवे मारण्याची धमकी देवुन तीघे चौघे तेथुन निघुन गेले.

३. त्यानंतर मी माझा भाउ लक्ष्मण शेणमारे याला फोन करुन घडलेली घटना सांगितली. त्यानंतर भावाने माझ्या वडीलांना सोलापूर येथील सिध्देश्वर दवाखान्यात नेले. त्यानंतर पुढील उपचारासाठी मी पण सोलापूरला गेलो. त्यानंतर मी त्याच दिवशी संध्याकाळी घटनेची फिर्याद दिली. आता मला सदरची फिर्याद दाखवली. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकुर बरोबर आहे. सदरची फिर्याद **निशाणी क्र. ७०** कडे आहे.

४. मला व माझ्या वडीलांना मारहाण करणाऱ्या आरोपींना पाहिल्यास मी ओळखु शकतो. आज रोजी आरोपी क्र. १ व ३ न्यायालयात हजर आहेत.

**उलटतपास आरोपी तर्फे वकील श्री. पी. बी. कोळेकर**

५. हे म्हणणे खरे नाही की, दि. १३.०८.२०१६ रोजी आरोपी क्र. १ हे त्यांच्या शेताच्या बांधावर गवत काढत होते. हे म्हणणे खरे नाही की, तेंव्हा माझ्या कुटूंबातील सदस्य चंद्रकांत शेनमारे, लक्ष्मण शेनमारे, महादेव शेनमारे, रामा शेनमारे, अरुणा शेनमारे, मंगल शेनमारे, संजय करंडे व विमल करंडे तेथे आले. हे म्हणणे खरे नाही की, तेंव्हा चंद्रकांत शेनमारे यांनी आरोपी क्र. १ यांना शिविगाळ करण्यास सुरतवात केली. हे म्हणणे खरे नाही की, तेंव्हा चंद्रकांत

शेनमारे यांनी त्यांच्या हातातील काठीने आरोपी क्र. १ च्या उजव्या हाताच्या मनगटावर, पाठीवर व डाव्या बरगडीवर मारले. हे म्हणणे खरे नाही की, तेंव्हा बाकीच्यांनी आरोपी क्र.५ यांना मारहाण करण्यास सुरवात केली. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी क्र. १ यांची सदरच्या मारहाणीमुळे डावी बरकडी फ्रॅक्चर झाली होती.

६. मी फिर्याद देतेवेळी चंद्रकांत शेनमारे यांना मारहाण झाल्यानंतर ते बेशुध्द झाल्याचे सांगितले होते. सदरच्या बाबीचा उल्लेख माझ्या फिर्यादीमध्ये नाही याचे कारण मला सांगता येत नाही. हे म्हणणे खरे नाही की, आरोपींनी आमच्या विरुध्द दाखल केलेल्या केसमध्ये मी तेथे नसल्यामुळे माझे सदरच्या केसमध्ये नाव घातले नाही. हे म्हणणे खरे नाही की, आरोपींनी दाखल केलेल्या केसला शह देण्यासाठी व सदरची केस तडजोड करण्यासाठी आम्हीं आरोपीं विरुध्द प्रस्तुतची खोटी केस केली आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी फिर्याद माझ्या वडीलांच्या सांगण्याप्रमाणे दिली होती. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या सरतपासातील संपूर्ण मजकुर खोटा आहे.

उलटतपास संपला.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्विकृत

KULDIP SUBASHRAO KULKARNI

Digitally signed by KULDIP SUBASHRAO KULKARNI
Date: 2024.07.10 16:44:49 +0530

**दिनांकः १०.०७.२०२४** **२रे प्रथमवर्ग न्यायादंडाधिकरी, तुळजापूर.**